मा. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या प्रतींचे मा. विधानमंडळ सदस्य व इतर मान्यवरांना वाटप करण्यासाठी फोल्डर्सची खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राअभा ६०१८/प्र.क्र.९१/तीन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २५ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक विविअ-२०११ / प्र.क्र.४०/ दोन, दिनांक ३० जानेवारी २०१२
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग३/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर २०१६
३. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दिनांक २४ ऑगस्ट २०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रारंभी मा.राज्यपाल महोदय विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांसमोर अभिभाषण करतात. सदर अभिभाषणाच्या प्रती एक्झिक्युटिव्ह फोल्डर्समधून सन्माननीय विधानमंडळ सदस्य व इतर मान्यवरांना पुरविण्याची प्रथा आहे. याकरीता आवश्यक असणारे फोल्डर्स या विभागाकडून खरेदी केले जातात. सन २०१९ मध्ये विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूका दिनांक २१ ऑक्टोबर २०१९ रोजी होणार आहेत. दिनांक २४ ऑक्टोबर २०१९ रोजी सार्वत्रिक निवडणूकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवनिर्वाचित विधानमंडळ सदस्यांचा शपथविधी, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांची निवड करणे यासाठी विधानसभेचे “विशेष अधिवेशन” अभिनिमंत्रित करावे लागणार असून सदर अधिवेशनाच्या प्रारंभी प्रथेनुसार मा.राज्यपाल महोदय विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांसमोर अभिभाषण करतील. मा.राज्यपाल महोदयांच्या सदर अभिभाषणाच्या प्रती एक्झिक्युटिव्ह फोल्डर्समधून सन्माननीय विधानमंडळ सदस्य व इतर मान्यवरांना पुरविण्यासाठी एकूण ३७० फोल्डर्स खरेदी करण्याचा प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन आहे.

२. राज्यशासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधिन दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस या पोर्टलवर वस्तू व सेवा यांची खरेदी करणे विभागांना बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि, वरीलप्रमाणे फोल्डर्सची खरेदी उक्त पोर्टलवरुन

करण्याच्या प्रकियेमध्ये काही वास्तविक अडचणी उद्भवतात जसे की, सदर फोल्डर्स हे विधानमंडळाचे मा.पीठासन अधिकारी, मा.विधानमंडळ सदस्य व इतर मान्यवरांना देण्यात येत असल्यामुळे त्यांच्या दर्जाबाबत काळजी घेणे अनिवार्य ठरते. उक्त पोर्टलवरुन खरेदी करणे बंधनकारक होण्यापूर्वी सदर खरेदी ही दरपत्रकावरील पुरवठादारांकडून करण्यात येत होती. त्यावेळेस पुरवठादारांनी पुरविलेल्या फोल्डर्सचा दर्जा, रुप, आकारमान इत्यादींची प्रत्यक्षपणे पाहणी तपासणी करणे शक्य होत होते. मात्र सदर सुविधा उक्त पोर्टलवरुन खरेदी करताना उपलब्ध नाही. प्रस्तुत फोल्डर्स हे मान्यवरांना द्यावयाचे असल्याने, त्याची अंतिम निवड ही मा.मंत्री, संसदीय कार्य यांच्याकडून फोल्डर्सची प्रत्यक्ष पाहणी करुन केली जाते. गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस मार्फत खरेदी प्रक्रियेत फोल्डर्स प्रत्यक्ष पाहण्याची सुविधा उपलब्ध नाही. या फोल्डर्समधून मा. राज्यपालांच्या अभिभाषणाच्या प्रती वितरीत करण्यात येत असल्यामुळे तपासणी न करता केवळ गर्व्हेनमेंट-ई-मार्केटप्लेस पोर्टलवर दिसणाऱ्या फोल्डर्सच्या प्रतिमेच्या आधारे खरेदी केल्यास आणि फोल्डर्सचा दर्जा अपेक्षेनुसार नसल्यास मान्यवरांकडून टीका व नाराजी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर पोर्टलवरुन नमुना फोल्डर (Sample copy) उपलब्ध करुन घेण्याची सुविधा नसल्याने त्याचा दर्जा तपासण्याची संधी उपलब्ध होत नाही. या पार्श्वभूमीवर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधिन अनुक्रमांक २ येथील दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयांतर्गत तरतुदीनुसार (परिच्छेद ३.२.३) दरपत्रकाच्या आधारे खरेदी करण्यास "एक विशेष बाब" म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव उद्योग, उर्जा व कामगार विभागास पाठविण्यात आला असता उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील प्रचलित तरतूदींच्या अनुषंगाने खरेदी प्रक्रिया राबविण्यास अनुमती दिली आहे.

शासन निर्णय :-

या विभागाच्या प्रस्तावावर उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दिलेली मान्यता लक्षात घेता, मा. राज्यपालांच्या अभिभाषणाकरीता करावयाच्या फोल्डर्सची खरेदी संदर्भाधिन अनुक्रमांक २ येथील दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन कार्यपद्धतीच्या सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक ३.२.३ नुसार दरपत्रकाच्या आधारे विहित कार्यपद्धती अवलंब करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. त्या अनुषंगाने मा.राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या प्रतींचे वाटप करण्यासाठी ३७० एक्झिक्युटिव्ह फोल्डर्सची खरेदी ही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधिन अनुक्रमांक २

येथील शासन निर्णयातील तरतूदीतील परिच्छेद क्रमांक ३.२.३ नुसार दरपत्रकाच्या आधारे करण्यास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत बाबीवर होणारा खर्च संसदीय कार्य विभागाच्या 'मागणी क्रमांक - पी - १, मुख्यलेखाशिर्ष २०५२ - सचिवालय - सर्वसाधारण सेवा, ०९० - सचिवालय, (००)(०१) संसदीय कार्य विभाग (अनिवार्य), संकेतांक (२०५२ ०२६८), १३, कार्यालयीन खर्च ' या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. संसदीय कार्य विभागाच्या संदर्भाधिन दिनांक ३० जानेवारी २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ च्या भाग पहिला, उपविभाग दोन खालील महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारातील अनुक्रमांक १ येथील नियम क्रमांक ७ मध्ये करण्यात आलेल्या बदलानुसार उक्त फोल्डर्स खरेदी करण्याकरीता रु.२,७५,०००/- इतक्या मर्यादेपर्यंतच्या खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार सचिव, संसदीय कार्य विभाग यांना प्रदान करण्यात आले असून. प्रस्तुत मान्यता सदर अधिकारानुसार देण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२५१२१४३१३६१५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sarfare Ramesh Sakharam

Digitally signed by Sarfare Ramesh Sakharam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Parliamentary Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=52e560d0b76dfea3392e26761deeb6b2efc5f1bea42c0dffdc1d69d316ae65a8, serialNumber=0c7001609c3ef1f1a1774b5223846fb28e7bf476529c879e1fd04746bfa60fd7, cn=Sarfare Ramesh Sakharam
Date: 2019.10.01 15:53:05 +05'30'

(र. स. सरफरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (संसदीय कार्य), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (जलसंपदा, जलसंधारण, संसदीय कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री, (गृह, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण, विधि व न्याय,संसदीय कार्य), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (उद्योग), मंत्रालय, मुंबई
५. सचिव (संसदीय कार्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.

८. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
९. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (सर्व कार्यासने), संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती.